REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २७ सप्टेंबर, १९५० अंक ३९

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली
भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—
शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर मॅनेजर

दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.
[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची
जबाबदारी मर्यादित असलेली. ]
स्थापनाः १९२६.
मुख्य कचेरी :
सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
तार : BANKOP फोन : १८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची
उत्तम व्यवस्था.
व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## मशिन्स् रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



पेडणेकर आणि कं.
लिमिटेड
शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी
१७२, गिरगांव रोड, मुंबई नं. ४.
फोन नं.–२२७३८

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे
विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमच्याकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**हिंदी रेल्वेजची संवत्सरी**—१९५३ मध्यें भारतामधील पहिल्या रेल्वे-रस्त्याची संवत्सरी साजरी करण्यांत येणार आहे असें समजतें. १८५३ सालीं भारतांतील पहिला रेल्वेमार्ग बांधून पुरा झाला. त्यावेळीं भायखळा तें ठाणा ह्या मार्गावरील पहिली गाडी सोडण्यांत आली. इंटर नॅशनल रेल्वे कॉंग्रेस असोसिएशनच्या रोम येथील अधिवेशनाला हजर रहाण्यासाठीं रेल्वे कमिशनर श्री. बसले जाणार आहेत; त्यावेळीं पुढील अधिवेशन भारतांत भरविण्याविषयीं ते आमंत्रण देणार आहेत.

**क्रप्सचे कारखाने मोडण्याचें बंद झालें**—प. जर्मनीचें शस्त्रास्त्रांचें मुख्य आगर जे क्रप्सचे कारखाने, ते मोडण्याचें आतां थांबविण्यांत आलें आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर लष्करी साहित्य तयार करणारे कारखाने मोडण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें होतें. तथापि जर्मनीकडून नुकसान-भरपाई करण्यासाठीं घेण्यांत यावयाचे कारखाने मात्र अजूनही मोडण्यांत येत आहेत. ह्या धोरणामुळें क्रप्सचे कारखाने पुन्हा चालू करण्यांत अडथळे येतील असें जर्मनांचें म्हणणें आहे.

**रशिआला यांत्रिक हत्यारें धाडण्याचें रद्द**—रशिआ आणि पूर्व यूरोपांतील इतर देश ह्यांना यांत्रिक हत्यारें धाडण्याचें बंद करण्याचा निर्णय ब्रिटननें घेतला आहे. ब्रिटन आणि त्याचे दोस्त ह्यांना ह्या हत्यारांची गरज आहे कीं नाहीं ह्यासंबंधीं तपासणी झाल्यावर निर्णयाचा फेर विचार करण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या हत्यारांचा उपयोग रशिआचें लष्करी बळ वाढण्याकडे होईल असें म्हणतात.

**मध्य प्रांतांत अंबाडीची लागवड**—मध्य-प्रांताच्या उत्तर भागांत अंबाडीची लागवड अधिक मोठ्या प्रमाणावर करण्यांत येणार आहे असें समजतें. ह्या वनस्पतीचें तागाशीं २५ टक्के पर्यंत मिश्रण करतां येतें. त्यामुळें भारताला लागणाऱ्या तागांत तेवढ्या प्रमाणांत बचत होईल असा अंदाज आहे.

**धुमसता असंतोष आणि व्यापार**—पूर्वेकडील राष्ट्रांचा रशियाचा गट आणि पाश्चिमात्य राष्ट्रांचा अमेरिकेचा गट ह्यांच्यांतील राजकीय तेढ विकोपाला गेली आहे. रशियाच्या गटाला युद्धदृष्ट्या महत्त्वाचा माल पुरवूं नये असा आग्रह अमेरिकेनें धरला आहे. परंतु मार्शल योजनेचे युरोपमधील प्रशासक मि. पॉल हॉफमन ह्यांच्या मतानें पूर्व युरोपाकडून प. युरोपाला मिळणारा कांहीं माल अमेरिका पुरवूं शकणार नाहीं म्हणून पूर्व-पश्चिम व्यापार चालू ठेवावा असा त्यांचा आग्रह आहे.

**पडिक जमिनीची लागवड**—मदुराई, रामनाद आणि तिनेवेल्ली ह्या जिल्ह्यांतील पडीक जमीन लागवडीला आणण्याची एक योजना मद्रास सरकारनें मंजूर केली आहे.

**यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—म्हैसूर सरकारनें मध्यवर्ती सरकारनें पुरस्कृत केलेला यांत्रिक हत्यारांचा कारखाना काढण्यासाठीं ३०० एकर जमीन देण्याचें ठरविलें आहे. ही जागा बंगलोरपासून ६ मैलांवर आहे. कारखान्याला १० कोटी रुपयांचें भांडवल लागणार आहे.

**संयुक्त प्रांतांत औद्योगिक ट्रायब्यूनल**—सध्यां संयुक्तप्रांतांत औद्योगिक तंट्यांची दखल घेणारीं ४ कोर्टें आहेत. त्या ऐवजीं आतां एक ट्रायब्यूनल स्थापण्यांत येणार आहे असें समजतें. ह्या कामासाठीं असणारीं प्रादेशिक कन्सिलिएशन बोर्डस् कायम रहाणार असून त्यांच्या निवाड्यावरील अपीलें ट्रायब्यूनलकडे पाठविण्यांत येतील. औद्योगिक तंट्यांचा निकाल ह्या व्यवस्थेमुळें लवकर लागेल अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे.

**टांगानिकांतील कापसाचें पीक**—टांगानिका ( पूर्व आफ्रिका ) भागांत चालू हंगामांत ७०,००० गांठी कापूस मिळेल असा अंदाज करण्यांत आला होता. परंतु आतां असें आढळून आलें आहे कीं ४२,००० गांठीपेक्षां अधिक कापूस येणार नाहीं. प्रतिकूल हवा आणि कापसावर पडलेली कीड ह्या कारणांमुळें पिकांची हानि झाली आहे.

**हिंदी रेल्वेसाठी परदेशी डबे**—भारत आणि स्वित्झरलंड ह्यांच्या दरम्यान नुकताच एक व्यापारी करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें उभय देशांत १३ कोटी रुपये किंमतीच्या मालाची देवाण घेवाण होईल. स्वित्झरलंड भारताला हलक्या वजनाचे आणि सुखसोयींनीं युक्त असे प्रवासी डबे पुरविणार आहे. हे डबे परकीय प्रवाश्यांच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठीं वापरण्यांत येणार आहेत असें समजतें.

**कोरियन युद्धामुळें हिऱ्यांना मागणी**—कोरियांतील युद्ध झाल्यापासून हिऱ्यांच्या किंमती १० ते १५ टक्क्यांनीं वाढल्या आहेत. हिऱ्यांना पैलू पाडणारे हॉलंडमधील कारखाने आतां सर्व आठवडाभर चालू लागले आहेत. युद्धापूर्वी दर आठवड्यांत कांहीं काळ कारखाने बंद असत. त्यामुळें बेकारी वाढली होती.

**पौण्ड डॉलर हुंडणावळीचा भाव**— सध्यां एका पौंडाला २८० डॉलर्स मिळतात. हा दर बदलून पौंडाला अधिक डॉलर्स मिळू लागणार असल्याच्या अफवा लंडनमध्यें पसरल्या होत्या. परंतु त्यांचा अधिकृतरीत्या इन्कार करण्यांत आला आहे.

**वय वाढतें तशीं बुबुळें बारीक होतात**—वाढत्या वयाबरोबर माणसाच्या डोळ्यांतील बुबुळें बारीक होत जातात असा निष्कर्ष ब्रिटिश डॉक्टर्सनीं काढला आहे. २० ते ८९ वयाच्या दरम्यानच्या २२२ लोकांचे डोळे तपासल्यानंतर त्यांनी हें अनुमान काढलें आहे.

**शिक्षणासाठी प. बंगालला मदत**—प. बंगालमधील शिक्षणाला मदत म्हणून भारतीय सरकारनें ७० लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

**स्टेट ट्रॅन्सपोर्टचें मासिक**—मुंबई राज्यांतील स्टेट ट्रॅन्सपोर्टनें एक मासिक काढण्याचें ठरविलें असून त्याचा पहिला अंक नुकताच प्रसिद्ध झाला. मासिकाचा मुख्य उद्देश जनतासंपर्क वाढविण्याचा आहे. तथापि वाहतुकीसंबंधीं माहिती देण्याचें कामही मासिक करणार आहे. पहिल्या अंकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत अध्यक्ष श्री. वाडीलाल लल्लुभाई ह्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, रस्त्यावरील वहातुकीच्या कराच्या उत्पन्नाचा विनियोग रस्ते चांगले राखण्याकडे करण्यांत यावा.

# अर्थ

बुधवार, ता. २७ सप्टेंबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लहान आणि मोठ्या बँका

### ठेवींचें पृथक्करण आणि पैशांचा विनियोग

१९४८ अखेर भारतांत एकूण ६४ हिंदी बँकांजवळ ( ५१ शेड्यूल्ड व १३ बिगर शेड्यूल्ड ) प्रत्येकीं १ कोटी रु. पेक्षां जास्त ठेवी होत्या. त्या ६४ बँकांजवळ मिळून एकूण ८८९ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. भारतांत नोंदलेल्या सर्व जॉइंट स्टॉक बँकांकडील ठेवींची रक्कम ९५१ कोटी रु. भरली. ह्याचा अर्थ, फक्त १०% बँकांजवळ एकूण ठेवींच्या ९४% ठेवी होत्या. ह्यापैकीहि, दोन तृतीयांश ठेवी सात मोठ्या शेड्यूल्ड बँकांकडेच होत्या. ह्यावरून, ठेवींच्या दृष्टीनें लहान बँकांचें स्थान कोणतें आहे, हें सहज लक्षांत येईल. १० कोटींच्या ठेवी असलेली एकहि शेड्यूल्ड बँक नव्हती. शेड्यूल्ड बँकांपैकीहि फक्त ७ बँकांचें नशीब १० कोटींच्या ठेवी असण्याइतकें मोठें होतें. ५४१ बिगर शेड्यूल्ड बँकांपैकी ५०७ शेड्यूल्ड बँकांच्या वाट्यास प्रत्येकीं ५० लक्षांच्याहि ठेवी आल्या नव्हत्या.

### मुदती व इतर ठेवी

ठेवींच्या मुदती, सेव्हिंग्ज व करंट अशी फोड केली, तर असें दिसून येतें कीं मोठ्या बँकांत मुदती किंवा सेव्हिंग्ज ठेवींपेक्षा करंट ठेवीच मोठ्या प्रमाणांत आहेत. बँकेचा आकार जसजसा कमी होत जातो, तसतसें मुदती ठेवींचें स्थान महत्त्वाचें होत जातें आणि सेव्हिंग्ज व करंट ठेवींचें प्रमाण उतरूं लागतें. २५ कोटी रुपयांपेक्षा ज्यास्त ठेवी असलेल्या बँकांकडील ठेवींतील ५८% रक्कम करंट ठेवींची होती; मुदती व सेव्हिंग्ज ठेवींचें प्रमाण १९% व १५% पडलें. १ कोटी ते १० कोटी ठेवींच्या बँकांतील हींच प्रमाणें अनुक्रमें ४१ ते ४८%, ३२ ते ३७% व १२ ते १७% अशीं आढळलीं. १ कोटी ठेवींच्यापेक्षा लहान बँकांतील ठेवींपैकीं फक्त २४ ते ३६% रक्कम करंट ठेवींत होती, तर मुदती ठेवींतील रक्कम ४४ ते ५४% पर्यंत भरली. लहान बँकांचें कार्यक्षेत्र मुख्यत्वें करून लहान गांवांतूनच असल्याकारणानें तेथें चेकच्या पद्धतीचा प्रसार फारसा झालेला नसतो. त्याचप्रमाणें, ठेवी आकर्षण्यासाठी त्यांना मुदती व सेव्हिंग्ज ठेवींवर ज्यास्त दरानें व्याज देणें सोईस्कर वाटतें, हें ह्या परिस्थितीचें कारण आहे.

ठेवींशीं भांडवल व रिझर्व्ह फंड ह्यांचें प्रमाण काढलें, तर शेड्यूल्ड बँकांत तें ७% आढळलें; बिगर शेड्यूल्ड बँकांत ते १६% पेक्षांहि अधिक आहे. ५ लक्ष रु. खालील ठेवींच्या बँकांत ते ५०% इतकें मोठें असतें. मोठ्या शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड बँकांतील रिझर्व्ह फंड त्यांच्या वसूल भांडवलापेक्षा जास्त आहेत, परंतु बिगर शेड्यूल्ड बँकांचे फंड त्यांच्या वसूल भांडवलापेक्षा दोन तृतीयांशाइतकेच भरतील.

### कर्जांत व रोख्यांत गुंतवणूक

लहान आणि मोठ्या बँका आपल्याजवळील रकमांचा विनियोग कसा करतात, हें पाहिलें तर लहान बँकांतून रोकड रकमेचें व कर्जाचें त्यांच्या रोख्यांतील गुंतवणुकीचे मानानें प्रमाण जास्त आढळतें. लहान बँका आपल्या ठेवीइतकी किंवा त्याहूनहि अधिक रक्कम कर्ज म्हणून देत असतात. ५० लक्ष रु. पेक्षां कमी ठेवी असलेल्या बँकांनीं आपल्याकडील ठेवींपैकीं ८२ ते ९७% रक्कम कर्ज देण्यासाठीं वापरली; सात मोठ्या शेड्यूल्ड बँकांत तें प्रमाण फक्त ३९% आहे. स्वाभाविकपणें, मोठ्या बँकांच्या मानानें लहान बँकांची रोख्यांतील गुंतवणूक कमी प्रमाणांत असते. त्यांनीं आपल्या ठेवींच्या २५ ते ३४% रक्कम रोख्यांत गुंतविली, तर मोठ्या बँकांनीं ५३% रक्कम अशा रीतीनें गुंतविली. लहान बँका रोख्यांत पैसे गुंतवितात, त्यापैकीं बराच भाग बिगर-सरकारी रोख्यांत असतो; मोठ्या बँका सरकारी रोखेच अधिक पसंत करतात. लहान गांवांत सरकारी रोख्यांच्या खरेदी-विक्रीची नीटशी सोय नसते आणि स्थानिक रोख्यांकडे त्यांना दुर्लक्ष करून भागत नाहीं.

### नफ्याचें प्रमाण

वरील विवेचनावरून, लहान बँकांना मिळणाऱ्या ठेवी ज्यास्त व्याजाच्या कशा असतात हें दिसून येईल. ह्या बँकांच्या भांडवलाच्या व रिझर्व्हच्या मानानें ठेवींची रक्कमहि लहान असते. म्हणजे, डिव्हिडंडचा बोजा अधिक बसतो. रिझर्व्ह फंडांतील रक्कम परत फेडीची नसल्यानें, ती दीर्घ मुदतीनें व ज्यास्त किफायतशीरपणें गुंतविण्याची सोय लहान बँकांना पुरेशी उपलब्ध नसते. तथापि, लहान बँका आपल्या परिस्थितीच्या मानानें ज्यास्त रकमा कर्जाऊ देतात आणि सरकारी रोख्यापेक्षा अधिक व्याजाचे इतर रोखे पसंत करतात. इतकें करूनहि, त्यांच्या नफ्याचें भांडवलाशीं व रिझर्व्हशीं प्रमाण काढलें तर तें ५·४% पडतें. शेड्यूल्ड बँकांत तें ९·७% पडतें, तर सात मोठ्या शेड्यूल्ड बँकांत तें १४% पेक्षांहि अधिक आढळतें. लहान-मोठ्या बँकांनीं वरील सर्व प्रमाणांशीं आपल्या स्वतःच्या प्रमाणांशीं तुलना करणें बोधप्रद होईल.

---

## बँकांच्या कामाचे तासांत कपात

मुंबईतील बँकांच्या कामाचे तास सोमवार ते शुक्रवार सकाळीं १०-४५ ते दुपारीं २-१५ व शनिवारीं सकाळीं १०-४५ ते ११-४५ करण्यांत आले आहेत. शनिवारीं बँका जनतेला अजिबात बंद असाव्यात, अशी सूचना इंडियन बँक्स असोसिएशननें रिझर्व्ह बँकेला केली आहे. बँक अवार्डनें बँकांतील कामाचे तास शनिवारीं ३॥ व इतर कामाचे दिवशीं ६॥ असे ठरवून टाकल्यामुळें, बँकांना वरीलप्रमाणें योजना करावी लागली आहे. कारण, जनतेसाठीं बँका उघड्या असतात त्यापेक्षां जास्त काळ आंतील काम चालू असतें. शनिवारीं चेक्सच्या क्लिअरिंगचें काम अजिबात बंद रहाणार आहे. शनिवारीं खात्यांत चेक भरला, तरी त्याच्या आधारावर मंगळवारपूर्वी चेक काढता येणार नाहीं. त्यामुळें बँकांत त्या दिवशीं फक्त रोखीचेच व्यवहार मुख्यतः होऊं शकतील. अमेरिकेंत बँका शनिवारीं अजिबात बंद असतात, त्याचा दाखला अर्थातच येथें उपयोगी पडण्याजोगा नाहीं.

पुण्यांतील बँका सोमवार-शुक्रवार १०-३० ते २ व शनिवारीं १०-३० ते १२ उघड्या रहाणार आहेत, असें समजतें.

## सो. रशिआंतील ॲग्रिकल्चरल बँकेचें कार्य

सो. रशिआंतील सामुदायिक शेतकी संस्थांना पतीवर कर्जे देण्याचें कार्य ॲग्रिकल्चरल बँक ऑफ दि. यू. एस. एस. आर. ही करते. ही बँक निरनिराळया कामाकरिता वेगवेगळया अटीवर कर्जे देते. तथापि बँकेचा मुख्य उद्देश सामुदायिक शेतीचा विकास करण्यासाठी जीं दीर्घ मुदतीचीं कर्जे लागतात तीं पुरविण्याचा आहे. गुरांचे सामायिक मालकीचे कळप वाढविण्यासाठी बँक लांब मुदतीचें कर्ज देते. त्याशिवाय विजेचीं केंद्रें उभारण्यासाठी, पाटबंधारे बांधण्यासाठी, सांडपाण्याचा निचरा करण्यासाठीं, अशा प्रकारच्या कर्जांची गरज लागते व ती बँकच पुरविते. चालू वर्षी ३८० कोटी रुबल्स किंमतीचीं कर्जे बँक सामुदायिक शेतकी संस्थांना देणार आहे. ह्या कर्जांपैकीं बहुतेक भाग गुरांच्या कळपांची वाढ आणि विजेच्या निर्मितीचीं केंद्रें ह्या योजनांवर खर्च होणार आहे.

कर्ज ज्या कामासाठीं दिलें असेल त्यासाठीच तें वापरण्यांत आलें पाहिजे असा नियम आहे. शिवाय कर्जाबरोबरच सामुदायिक शेतकी संस्थांनीं आपल्या उत्पन्नाचा कांहीं भागही विकास योजनांसाठीं वापरावयाचा असतो. गुरें विकत घ्यावयाचीं असतील तर ५० टक्के रक्कम कर्जाऊ मिळते. त्याची मुदत ५ वर्षांची असते. शेळया–मेंढ्या, डुकरें विकत घ्यावयाचीं असतील तर खर्चाच्या ४० टक्के रक्कम ३ वर्षांच्या मुदतीनें मिळते. कर्जाची परतफेड साधारणमानानें दुसऱ्या वर्षापासून करावयाची असते. कर्जाचीं वर दिलेलीं प्रमाणें सरासरीचीं आहेत. कांहीं शेतकी संस्थांना वरील प्रमाणाखेरीज अधिकही कर्ज मिळूं शकतें. सर्व सामान्यपणें व्याजाचा दर ३ टक्के असतो. सध्या सामायिक मालकीच्या गुरांची संख्या वाढविण्याचा तीन वर्षांचा कार्यक्रम रशिआंतील सामुदायिक शेतकी संस्थांनीं आखला आहे. त्यासाठीं ॲग्रिकल्चरल बँकेनें १० वर्षे मुदतीचीं कर्जे देण्याचें ठरविलें आहे. परतफेड कर्ज घेतल्यानंतर तिसऱ्या वर्षापासून करावयाची असते. गुरांना रहाण्यासाठी मोठमोठे गोठे बांधण्यासाठी, आणि ह्या धंद्याच्या यांत्रिकीकरणासाठीं कर्जाचा उपयोग करण्यांत येणार आहे. योजनेसाठीं जो खर्च येईल त्यापैकीं ७५ टक्के कर्ज देण्यांत येईल. कांहीं सामुदायिक शेतांना तर १०० टक्के कर्ज पुरविण्यांत येण्याचा संभव आहे.

रशिआंतील सामुदायिक शेतीसाठी वीज पुरविण्याचें काम जोरांत चालू झालें आहे शेतीच्या धंद्यांत विजेच्या शक्तीचा जास्तींत जास्त उपयोग करण्याचें रशिअन सरकारनें ठरविलें आहे. चालू वर्षी ३,०१० नवीन विजेचीं केंद्रें बांधण्यांत येणार आहेत. ह्या केंद्रांतून १०,००० सामुदायिक शेतांना विजेचा पुरवठा करण्यांत येईल. विजेचीं केंद्रें उभारणें, विजेच्या खांबांची व तारांची व्यवस्था करणें आणि विजेचीं उपकरणें बसविणें इत्यादि कामासाठीं बँक कर्जे देणार आहे. विजेचीं केंद्रें उभारण्यासाठी जो खर्च येईल, त्यापैकीं ७५ टक्के कर्ज १० वर्षांच्या मुदतीनें बँक देणार आहे. कर्ज दिल्यानंतर तिसऱ्या वर्षापासून परतफेडीला सुरवात करावयाची आहे. झाडें लावण्याच्या मोहिमेलाही कर्जे देण्यांत येतात. जंगलें व कृत्रिम तळीं ह्यांची वाढ करण्यासाठीं सरकारनें चालू वर्षी १५० कोटी रुबल्सचीं कर्जे बँकेमार्फत देण्याचें ठरविलें आहे. हीं कर्जे खर्चाच्या रकमेच्या ९० टक्के दिलीं जातात. त्यांची मुदत ५ वर्षांची असते.

### मुं. प्रां. सहकारी बँकेची सिन्नर शाखा

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची शाखा सिन्नर ( जिल्हा नाशिक) येथें रविवार दिनांक १७–९–५० रोजीं सदर बँकेचे मॅनेजर श्री. य. बा. गायतोंडे यांचे हस्तें उघडण्यांत आली. सदर प्रसंगीं मे. डेप्युटी रजिस्ट्रार साहेब नाशिक विभाग, मे. अ. रजिस्ट्रार साहेब धुळें, श्री. दि. व. वंडेकर डायरेक्टर मुंबई प्रांतिक सहकारी बँक लि., सीनिअर इन्स्पेक्टर साहेब नाशिक भाग शेतकी व इतर सोसायट्यांचे प्रतिनिधी, गांवांतील प्रमुख सद्गृहस्थ व व्यापारी मंडळी हजर होती.

### महाराष्ट्र बँकेच्या शाखा एजंटांची परिषद

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या सर्व शाखा एजंटांची एक परिषद पुणें येथें शनिवार, दि. १६ सप्टेंबर रोजीं भरविण्यांत आली होती. त्यावेळीं बँकेचे डायरेक्टर व मुख्य कचेरींतील वरिष्ठ अधिकारी हेहि उपस्थित होते. रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर व बँकेचे एक संस्थापक–डायरेक्टर श्री. वा. पुं. वर्दे हेहि निमंत्रणावरून उपस्थित होते. अशा परिषदेंतील प्रत्यक्ष चर्चेमुळें कित्येक प्रश्नांचा खुलासा होण्यास चांगली मदत होते. डायरेक्टरांना ज्याप्रमाणें अडचणी खुलेपणानें कळूं शकतात, त्याचप्रमाणें एजंटांचें मार्गदर्शनहि अधिक चांगलें होतें आणि कार्यक्षम अधिकारी वर्ग तयार होण्यास त्याचा चांगला उपयोग होतो. बँकेच्या नव्या इमारतीमधील सेफ डिपॉझिट व्हॉल्टचें पहिलें दार श्री. वर्दे ह्यांच्या हस्तें बसविण्याचा लहानसा घरगुती समारंभहि दि. १७ रोजीं पार पाडण्यांत आला.

### चीनीच्या प्रवासाची पूर्वतयारी

२० अमेरिकन प्रवासी एका खास विमानानें हिंदुस्थानच्या प्रवासासाठी जानेवारी १९५१ मध्यें येणार आहेत. त्यांच्या पूर्व तयारीसाठी अमेरिकन उतारू संस्थेचे अध्यक्ष ले. क. वॉरविक हे भारतांत आले आहेत.

### अमेरिकेंत चहाचा प्रसार

अमेरिकेंत चहाचा प्रसार करण्यासाठी तेथील चहाचे व्यापारी आणि चहा निर्गत करणारे देश ( भारत, पाकिस्तान, सिलोन व इंडोनेशिया ) ह्यांनीं एक समाइक " टी कौन्सिल " स्थापण्याचें ठरविलें आहे. दोघांनीं सारख्या प्रमाणांत पैसे देऊन १६ लक्ष डॉलर्सचा फंड प्रचारासाठी उभा केला आहे.

### पुणें म्यु. कॉर्पोरेशनच्या कर्जरोख्यांवरील व्याज महाराष्ट्र बँकेमार्फत मिळणार

पुणें म्यु. कॉर्पोरेशननें नुकतींच दोन कर्जे उभारलीं त्यांवरील व्याज बँक ऑफ महाराष्ट्र लि. मार्फत देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याप्रमाणें सप्टेंबरमध्यें द्यावयाचें व्याज बँकेनें देण्यास प्रारंभहि केला आहे. इंपीरिअल बँकेमार्फत व्याज दिलें जाईल अशी मूळ योजना होती, परंतु आतां हें काम महाराष्ट्र बँकेला मिळालें आहे.

बटाट्याच्या पिकासाठी कर्जे—मध्यप्रांत सरकारनें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेचा एक भाग म्हणून शेतकऱ्यांना १६ लाख रुपयांचीं तगाई कर्जे देण्याचें ठरविलें आहे. रब्बीच्या हंगामांत शेतकऱ्यांनीं बटाट्यांची लागवड अधिक जमिनींत करावी म्हणून हीं कर्जे देण्यांत येणार आहेत.

## पौंडाच्या अवमूल्यनानंतर एक वर्षानें

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यांत पौण्डाची किंमत उतरवली गेली ही गोष्ट स्टर्लिंग चलनाच्या देशांच्या हुंडणावळीच्या दृष्टीनें योग्य अशीच झाली. कारण, त्यापूर्वी कित्येक वर्षे डॉलरची किंमत असावी त्यापेक्षा कमी होती असें मत इंग्लंडमधील एकॉनामिस्ट या पत्राचे उपसंपादक पॉल बैरो यांनीं व्यक्त केलें आहे. पौंडाच्या अवमूल्यनानंतर स्टर्लिंग गटांतील देशांचा व्यापार सुधारला आहे असें त्यांचें मत असून यामुळें अर्थव्यवहारांतील दोष नाहींसे होऊं शकतील यामुळें निरनिराळ्या राष्ट्रांतील परराष्ट्रीय देण्याचा प्रश्न सहज रीतीनें सुटूं शकणार आहे. गेल्या एका वर्षांत पुन्हां स्टर्लिंग देशांच्या चलनाला स्थैर्य प्राप्त होत आहे व त्यामुळें आंतरराष्ट्रीय व्यापाराला पुन्हां नवीन वळण लागत आहे. सप्टेंबर १९४९ पासून ब्रिटनची डॉलर व सुवर्ण शिल्लक वाढत आहे ही गोष्ट सुधारत आणाऱ्या परिस्थितीची निदर्शक आहे. अवमूल्यनापूर्वी ब्रिटनची सुवर्ण व डॉलर शिल्लक फक्त १३४० दशलक्ष डॉलर्स होती ती १९४९ अखेर २६३ दशलक्ष डॉलर्सनी वाढली, व १९५० च्या पहिल्या दोन तिमाहींत या शिलकीमध्यें अनुक्रमें २९६ दशलक्ष व ४३८ दशलक्ष डॉलर्स या प्रमाणें वाढ झाली. चालू वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहींत स्टर्लिंग गटाकडून डॉलर गटांतील व्यापारांत एकंदर अनुकूल तफावत २२० दशलक्ष डॉलर्स उरली. स्टर्लिंग गटांतील कांहीं कच्चा माल अमेरिकेनें योग्य किंमतींत मोठ्या प्रमाणांत खरेदी केला यामुळें स्टर्लिंग देशांची परिस्थिति थोडीशी सुधारली. यामुळें लंडन शहराचें पूर्वीचें महत्त्व यापुढें पुन्हां प्रस्थापित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जागतिक व्यापारांत स्टर्लिंग गटाचें महत्त्व पुन्हां एकदां निर्माण होऊन त्यामुळें एकंदर आर्थिक परिस्थिति सुधारण्याला बरीच मदत होणार आहे.

पौंडाच्या अवमूल्यनामुळें कदाचित् चलनवाढ होऊन किंमतीची वाढ होईल अशी शंका होती परंतु खुद्द इंग्लंडमध्यें वस्तूंच्या किंमती किंवा मजुरीचे दर यांच्यांत वाढ म्हणण्यासारखी झालेली नाहीं व मजुरीचा दर फक्त एका निर्देशांकानें वाढला आहे; व रहाणीच्या खर्चाच्या निर्देशांकांत सुमारें दोन टक्के वाढ झाली आहे. सरकारकडून मिळणाऱ्या मदतीमुळें रहाणीच्या खर्चांत अगदीं दोनच टक्के वाढ झालेली दिसते. परंतु याच वेळीं सामान्य किंमतींत १० टक्के वाढ झाली आहे, व आयात मालाच्या किंमतींत २० टक्के वाढ झाली आहे. तेव्हां संयमाची जरूरी अद्यापहि कायम आहेच. ब्रिटनच्या एकंदर आर्थिक कारभाराची परिस्थिति किंवा विशेषत: तिजोरीची परिस्थिति समाधानकारक राहिल्यामुळें स्टर्लिंगची परिस्थिति मजबूत राहूं शकली असें पॉल बैरो यांचें मत आहे. याप्रमाणें गेल्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांतील पौंडाचें अवमूल्यन ही घटना ब्रिटनच्या दृष्टीनें एकंदरीत बरीच फायदेशीर झालेली दिसते व त्यामुळें स्टर्लिंग गटांतील व्यापाराची परिस्थिति पुन: एकदां सुधारूं लागेल. हें यश येण्याचें मुख्य कारण म्हणजे प्राप्त झालेल्या संधीचा ब्रिटननें जास्तींत जास्त उपयोग करून घेतला.

### सहकारी शेती संस्थांना मदत

शेती करण्यासाठी स्थापन झालेल्या सहकारी संस्थांनाहि, पाणी पुरवठ्यासाठी नव्या विहिरी बांधणें आणि जुन्या दुरुस्त करणें याबाबतच्या योजनेनुसार तगाई कर्जें मिळतील, असा मुंबई सरकारनें आदेश दिला आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर:

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.    वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



बेडेकर लोणच्याचा तयार मसाला



**दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,१३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिश: भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर    म. अं. दप्तरदार, बी. ए., चेअरमन.

### पुणें जिल्हा सहकारी खरेदी–विक्री संघ लि.

३०–५–१९५० अखेर सरकारनें नियुक्त केलेलें कार्यकारी मंडळ वरील संघाचे अधिकारपदावर होतें. २१–५–१९५० रोजीं निवडणुका होऊन नवें कार्यकारी मंडळ अधिकारावर आलें. अहवालाचे वर्षी संघानें भवानी पेठ, पुणें येथें शेतकऱ्यांना माल विकून देण्याकरितां अडत दुकान चालू केलें. संघानें ७२ लक्ष, ७९ हजार रुपयांचा माल विकून १,१४,७९८ रु. व्यापारी नफा व २६,१३३ रु. निव्वळ नफा मिळविला. बदललेल्या सहकारी धोरणामुळें तळेगांव व ढिकसळ येथील कापडाचीं कोठार केंद्रें बंद करून फक्त पुणें येथील केंद्र सुरू ठेवलें आहे. संघानें सिमेंट व लोखंड ह्यांचें वाटप १९४८–४९ चे मानानें बरेंच जास्त केलें. खतें–पेंड ह्यांच्या वाटप योजनेस आतां सरकारी मंजुरी आली आहे. संस्थेच्या मालकीच्या जागेवर ( १२५–२६, भवानी पेठ, पुणें ) कोठारें व इमारत बांधण्याची योजना चालू आहे. ६¼% डिव्हिडंड देण्यास २,३८७३ रु. लागतील. ( चेअरमनः य. द. खोले, मॅनेजरः नारायण दत्तात्रय कुलकर्णी )

---

### इस्लामपूर अर्बन को. बँक लि.

ह्या बँकेच्या सर्व खात्यांत वाढ होऊन उलाढालीची रक्कम सुमारें २४ लक्ष रुपये झाली आहे. खेळतें भांडवल १,३०,९४२ रु. चें आतां १,४३,२६० रु. झालें आहे. बँकेजवळील शिलकेपैकीं २०,००० रु. सरकारी कर्जरोख्यांत गुंतवलेले आहेत, हें विशेष नमूद करण्यासारखें आहे. बँकेचें शेअर भांडवल वाढवून व कर्जाच्या मर्यादा वाढवून बँकेचा व्यवहार आणखी वाढविण्याची व्यवस्था पोटनियम दुरुस्त करून करण्यांत येणार आहे. अहवालाचे वर्षी २३०७ रु. नफा झाला. ४% डिव्हिडंडला ९७० रु. लागतील. (चेअरमनः गो. ल. फडणीस, बी. ए., एलएल. बी., सेक्रेटरी : के. डी. बोरकरः )

---

### बार्शी सें. को. बँक लि.

अहवालाचे वर्षी ठेवींत घट न होता त्यांत वाढच होऊन ठेवींची रक्कम १४,६१,९७९ झाली. शेअर भांडवल ८२,२८० रु. व फंडस् १,०४,२११ रु. असें १,८६,४९१ रु. चें बँकेचें स्वतःचें भांडवल आहे. बँकेनें बाहेरील कर्ज मुळीच घेतलेलें नाहीं. बँकेनें एकूण ८,५१,००७ रु. कर्जाऊ दिलेले आहेत. त्यांत संशयित अथवा बुडीत असें कर्ज नाहीं. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा २०,१६३ रु. झाला. ६¼% डिव्हिडंडला ५,१४२ रु. लागतील. ( चेअरमनः गोविंद रघुनाथ काळे, मॅनेजरः विश्वनाथ एकनाथ रेडे. )

---

### धुळें अर्बन को. बँक लि.

वरील बँकेच्या सुमारें ११ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलांत ३ लक्ष, ६ हजार रु. चें बँकेचें स्वतःचें भांडवल आहे. हें प्रमाण कित्येक बँकांपेक्षां फारच समाधानकारक आहे. बँकेनें सुमारें १ लक्ष व ३३ हजार रु. रोख, बँकांत ठेऊन २,१३,०७५ रु. ची रोख्यांत इन्व्हेस्टमेंट केली आहे. गेल्या चार महिन्यांत ठेवी व कर्जे ह्यांतील समतोलपणा राखण्यासाठीं सभासदांना कर्ज देणें बंद ठेवलें होतें, तें योग्यच झालें. थकबाकी थोडी वाढली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १९,४१८ रु. नफा झाला. त्यांतून ७,८१, रु. चा विनियोग ६¼ डिव्हिडंडसाठीं करण्यांत येईल. ( चेअरमनः ग. मो. वराडे, मॅनेजरः ए. एस. देशपांडे. )

### चाळिसगांव पीपल्स को. बँक लि.

७२४ सभासद संख्या, ६५,६५० रु. शेअर भांडवल १३,२७२ रु. रिझर्व्ह व इतर फंड, ३,२२,२४० रु. ठेवी ४,३२,८९७ रु. खेळतें भांडवल, २,६१,११० रु. रोख बँकांत शिल्लक, १०,७८४ रु. इनव्हेस्टमेंट, १,५६,५५२ रु. कर्ज इत्यादि प्रमुख आंकडे बँकेच्या ताळेबंदांत आहेत. अहवालाचे वर्षी बँकनें ७६,४४० रु. चें कर्ज वाटलें. थकबाकी कमी करण्याचा विशेष प्रयत्न असल्यामुळें ती फार कमी आहे. धान्य कापड वांटपाचें काम गेल्या दोन वर्षांपासून बँक करीत आहे. एकूण वाटप दुकानांत ३,७९५ रु. नफा झाला. बँकेच्या व्यवहारांतील नफा १२,३९२ रु. आहे. ६¼% डिव्हिडंडाला ३,८३१ रु. लागतील. वाटपाच्या प्रत्येक दुकानाचे हिशेब डायरेक्टरांनीं अहवालांत दिले आहेत हें त्याचें वैशिष्ट्य आहे. ( चेअरमनः कन्हैयालाल सखाराम खाबीया, मॅनेजरः ए. डी. पाटील. )

---

### शेतकऱ्यांना कर्जें पुरविणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत

कर्ज देण्यास लायक अशा सर्व शेतकऱ्यांना कर्जें देण्याबाबतची योजना अंमलांत आणतां यावी म्हणून मुंबई सरकारतर्फे मुंबई राज्यांतील पैसा पुरविणाऱ्या १० संस्थांना आर्थिक मदत देण्यांत येत आहे. सदरहू आर्थिक मदतीच्या योजनेनुसार विजापूर, बडोदें व मेहसाणा जिल्ह्यांतील सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकांना प्रत्येकीं पहिल्या वर्षी २,४०० रु., दुसऱ्या वर्षी १,८०० रु. व तिसऱ्या वर्षी १,२०० रु. या प्रमाणांत आर्थिक मदत देण्यांत येईल. कारवार, कोल्हापूर व अमरेली या जिल्ह्यांतील सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकांना प्रत्येकी पहिल्या वर्षी १,८०० रुपये, दुसऱ्या वर्षी १,३५० रु. व तिसऱ्या वर्षी ९०० रुपये याप्रमाणें आर्थिक मदत मिळेल. त्याचप्रमाणें हलोल व कालोल, पूर्व पंचमहाल, चिखली तालुका व वाडा येथील कोऑपरेटिव्ह बँकिंग युनियनना पहिल्या वर्षी १,५०० रु., दुसऱ्या वर्षी १,१२५ रु. व तिसऱ्या वर्षी ७५० रु. याप्रमाणें आर्थिक मदत मिळेल. सदरहू संस्थांना जोपर्यंत सरकारकडून आर्थिक मदत मिळेल तोपर्यंत त्यांना ४ टक्क्यांपेक्षां अधिक नफा जाहीर करतां येणार नाहीं. तसेंच विजापूर जिल्हा सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेनें ग्रामसंस्था आणि विविध कार्यसंस्था यांना दिलेल्या कर्जाच्या बाबतींत पांच टक्क्यांपर्यंत नुकसान सोसण्याची हमीहि सरकारनें या बँकेला दिली आहे. सुरवातीस दोन वर्षांपुरती ही हमी देण्यांत आली आहे.

---

**स्विट्झरलंड-पाकिस्तान व्यापार**—पाकिस्तान आणि स्विट्झरलंड ह्यांच्या दरम्यान एका वर्षाच्या मुदतीचा व्यापारी-करार झाला आहे. कराराप्रमाणें उभय राष्ट्रांत ७ कोटी स्विस फ्रॅंक्स किंमतीचा व्यापार होईल. पाकिस्तान दुधाचे पदार्थ, रसायनें, रंग, घड्याळें, विजेचीं उपकरणें इत्यादि माल आयात करणार आहे, आणि कापूस, तांदूळ, गहूं, ताग, कातडीं, चहा, सुकी फळें इत्यादि माल निर्यात करणार आहे.

**सीलोनमधील युरोपियन लोक**—सीलोनमधील मळेवाल्यांना तेथील सरकारनें असा हुकूम दिला आहे कीं, त्यांनीं सुपरिंटेंडन्टस अगर त्यांचे दुय्यम ह्या जागांवर आतां युरोपिअन लोकांना नेमूं नये. सीलोनमधील शाळा–कॉलेजांतून शिकून बाहेर पडणाऱ्या तरुणांना नोकऱ्या मिळण्यास सुलभ जावें म्हणून वरील आज्ञा काढण्यांत आली आहे.

## सहकारी बँकांचा अनुभव

### ( एका सहकारी बँकेच्या अहवालांतील उतारा )

शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या गरजा भागविण्याची जबाबदारी सरकारी धोरणामुळें सहकारी बँकांची असली तरीपण नुसते शेती कर्जच नव्हे, तर त्याचे जोडीस इतरही अनेक व्यवसाय व कापड व धान्य इ. वस्तूंचे वाटपही सोसायट्यांमार्फतच व्हावें असेंही धोरण अमलांत आहे. आतां आणखी तगाई कर्जेही सहकारी सोसायट्यांनीच वाटावीत अशी योजना होत असल्याचें कळतें. यावरून मध्यवर्ती बँकांवर केवढा बोजा यापुढें पडणार आहे याची कल्पना करतां येईल. वर निर्देशिलेल्या बाबींची सुरवात झालेली आहेच. त्या बाबतींत अहवालाचे वर्षी जो अनुभव आला तो नमूद करून कांहीं सूचना करणें अवश्य वाटतें.

(१) नवीनच स्थापन झालेल्या सोसायट्यांस कोणत्याच प्रकारच्या कामाचा अनुभव नसतां त्यांना कापड व धान्यवाटप कामें दिलीं गेल्यामुळें त्यांच्या कर्ज व्यवहारावर व एकंदर कामकाजावर अनिष्ट परिणाम होत आहे.

(२) धान्यवाटप कामासाठीं सोसायट्यांना बँक पैसे पुरवीत असतांही कित्येक वेळां त्यांनीं उधार धान्य मिळविल्यामुळें त्यांचेवर पुष्कळदा कर्जाचा अधिक बोजा पडून खर्चही वाढला. त्याचाही परिणाम सोसायट्याची आर्थिक स्थिति व कार्यक्षमता यावर झाल्यावांचून राहिला नाहीं.

(३) वाटपाचीं कामें घेतल्यामुळें सोसायट्यांचें खेळतें भांडवल वाढलें व हातांत पैसा खेळूं लागल्यामुळें व अनुभव नसल्यामुळें बहुतेक सोसायट्या नुकसानींत आल्या व घोटाळेही माजले. अशा सोसायट्यांचे ऑडिट खात्याकडून होण्यास विलंब लागल्यामुळें त्या सुधारण्यास बराच अवधि लागलेसें दिसतें. त्यामुळें त्यांच्या नित्याच्या व्यवसायासही अडथळा येत असून शेतकऱ्यांची कुचंबणा होत आहे.

वर दिलेल्या प्रकारावरून अनेक अडचणींतून सोसायट्यांस जावें लागत आहे व यामुळें बँकेचा कर्ज व्यवहार व सोसायट्यांची कार्यक्षमता यावर अनिष्ट परिणाम होऊं लागला आहे. या सर्व गोष्टींचा सहकारी खातें, बँक व सोसायट्यांचे प्रतिनिधी यांनीं वेळींच विचार करून धोरण ठरविणें अवश्य आहे.

---

## स्वदेशी रेल्वेच्या डब्यांचा पुरवठा

यंदा आर्थिक अडचणीमुळें खंडित झालेल्या भारतीय रेल्वेच्या पुर्नव्यवस्थेबाबतचा कार्यक्रम पुन्हां सुरू करण्याचें दृष्टीनें रेल्वे बोर्डानें १९५१–५२ मध्यें रेल्वेचे विविध प्रकारचे डबे बनविण्यासाठीं मेसर्स बर्न ॲण्ड कंपनी, हावरा, मेसर्स ब्रेथवाइट ॲण्ड कंपनी व मेसर्स जेसप ॲण्ड कंपनी, कलकत्ता आणि इंडियन स्टँडर्ड वॅगन वर्क्स, बर्नपूर या कंपन्याशीं चालविलेल्या वाटाघाटी पुऱ्या होण्याच्या बेतांत आहेत. प्रत्येक कंपनीकडे केलेली मागणी सद्यःस्थितींतील तिच्या अंदाजी उत्पादनक्षमतेइतकी आहे. १९५१–५२ मध्यें निरनिराळ्या रुंदीच्या ( गेज ) रेल्वेसाठीं सुमारें ६,००० डबे देण्यांत यावेत अशी मागणी करण्यांत आली असून त्यांची किंमत साधारणपणें ६ कोटी रु. पर्यंत जाईल असा अंदाज आहे. सामानाचा तुटवडा व मजुरांतील असंतोष या कांहीं वेळच्या कठीण परिस्थितींत देशी कारखान्यांकडून यंदा वेळच्या वेळीं डब्यांचा प्रत्यक्ष पुरवठा कितपत होतो त्यावर १९५२–५३ मध्यें त्यानंतरच्या दोन वर्षांत भारतांतून रेल्वे डबे मिळविण्यासाठीं अशा प्रकारची मागणी करण्याचें अवलंबून राहील.


दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखाः–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी

फोनः ३४५१९　　तारः SAHYOG

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः–

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस ॲंड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.



## संयुक्त-प्रांतांतील सहकारी चळवळ

संयुक्त-प्रांत सरकारच्या कोऑपरेटिव्ह आणि डेव्हलपमेंट खात्याच्या सूचनेवरून, प्रांतांतील सहकारी चळवळीच्या कार्याचा आढावा घेण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. सहकारी चळवळीचा व्याप किती आहे आणि तिचा अधिक प्रसार होण्यासाठीं करावयाच्या योजना 'ह्यासंबंधीं वरील कमिटीनें शिफारसी करावयाच्या आहेत. कागदोपत्रींच पहावयाचे झालें तर ह्या प्रदेशांत सहकारी चळवळीनें चांगली प्रगति केली आहे, असें दिसून येते. सध्या प्रांतांत एकूण ३८,००० सहकारी संस्था आहेत आणि सभासदांची संख्या जवळ जवळ २८ लाख आहे. खेळतें भांडवल १७ कोटी रुपयांचें आहे. शेतकी माल निर्माण करणाऱ्या, सुधारलेल्या पद्धतीनें शेती करणाऱ्या, जमिनीच्या तुकड्यांचें एकीकरण करणाऱ्या, अशा अनेक प्रकारच्या सहकारी संस्था आहेत. ग्राहकांच्या सहकारी संस्थांची संख्या २३७ असून त्यांची सभासद संख्या सुमारें ३ लाख आहे. ह्यापैकीं बहुतेक संस्था अन्नधान्याचा शिधा वांटणाऱ्या आहेत. संयुक्त-प्रांत सरकारच्या जमीनदारी रद्द करण्याच्या कायद्यांत सहकारी शेतीला प्रोत्साहन देण्यांत आलेलें आहे. आर्थिक दृष्ट्या न परवडणाऱ्या अशा लहान लहान शेतांची लागवड करण्यापेक्षां सहकारी शेती करणें अधिक किफायतशीर होतें असा अनुभव आहे.

सहकाराच्या तत्त्वाला आतां चांगली मान्यता मिळाली आहे. सहकारी पद्धतीनें होणारे फायदेही स्पष्ट झालेले आहेत. तथापि असें असून सुद्धां निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्था ज्या प्रमाणांत यशस्वी व्हावयास पाहिजे होत्या, तितक्या प्रमाणांत त्या झालेल्या नाहींत. संयुक्त प्रांत सरकारनें नेमलेली कमिटी ह्या प्रश्नाची चौकशी करीलच. आजवर आलेला अनुभव असा आहे कीं सहकारी चळवळींत शेतकऱ्यानें जितकें लक्ष घालावयास पाहिजे तितकें तो घालीत नाहीं. ही अडचण सर्वांत मोठी आहे आणि तिचें कारण शोधून काढणें जरूर आहे. सहकारी संस्थांतून नफा मिळविण्याची आकांक्षा नसल्यानें सभासदांना लागणाऱ्या वस्तू स्वस्त मिळतील अशी अपेक्षा असते. परंतु पुष्कळदां अनुभव मात्र उलट येतो. ग्राहकांच्या सहकारी संस्था कार्यक्षमतेनें आणि काटकसरीनें चालविल्या जात नाहींत, आणि ग्राहक अशा संस्थांचा फारसा फायदा घेत नाहींत. संयुक्त प्रांतापुरतेंच बोलावयाचें झाल्यास, ग्राहकांच्या सहकारी संस्था अन्नधान्याचें वांटप करीत असल्यामुळें लोक संस्थांचे सभासद झाले आहेत. शिधापद्धति बंद झाल्यावर सभासद कायम रहातील किंवा नाहीं हा प्रश्नच आहे. संयुक्त प्रांत सरकारच्या सहकारी खात्याच्या स्टँडिंग कमिटीनें ग्राहकांच्या सहकारी संस्थांबाबत कांहीं सूचना केल्या आहेत, त्या लक्षांत घेण्यासारख्या आहेत. ह्या संस्थांच्या सध्यांच्या नियमाप्रमाणें नफ्यापैकीं ३३ टक्के रक्कम त्यांना रिझर्व्ह फंडांत टाकावी लागते. त्या ऐवजीं ती २५ टक्केच टाकण्याची परवानगी देण्यांत यावी अशी सूचना करण्यांत आली आहे. ह्या दुरुस्तीमुळें संस्थांना आपल्या जमाखर्चाचा मेळ घालतां येईल असा कमिटीचा अंदाज आहे. एका संस्थेतर्फे अन्नधान्याच्या वांटपाचीं जितकीं केंद्रें चालविण्यांत येतात, त्यांच्या संख्येंत वाढ करण्यांत यावी आणि संस्थांना शिधापद्धति लागू असलेल्या जिनसांप्रमाणेंच, इतरही जिनसा विकण्याची परवानगी देण्यांत यावी अशीही एक सूचना करण्यांत आली आहे. इतर प्रकारच्या सहकारी संस्था नीट चालण्यास काय सवलती याव्या ह्याचाही विचार कमिटी करील असा अंदाज आहे.

---




—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—

**खादी मन्दिर**

२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.